RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ११, अंक ९०] गुरुवार, ऑक्टोबर ३०, २०२५/कार्तिक ८, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक १९९**

**प्राधिकृत प्रकाशन**

### कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम चे कलम ३७ (१) अन्वये

### सूचना

क्रमांक कडोंमपा/नरवि/३४७४.— ज्याअर्थी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका (यापुढे जिचा उल्लेख " उक्त महानगरपालिका" असा करण्यात आला आहे.) हद्दीतील कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील २७ गावांकरिता विकास योजना (यापुढे जिचा उल्लेख "उक्त विकास योजना" असा करण्यात आला आहे.) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे.) चे कलम ३१ (१) मधील तरतुदीनुसार शासन नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-१२१२/१६९७/प्र.क्र.१०१/१३/नवि-१२, दिनांक ११ मार्च २०१५ अन्वये सारभूत स्वरूपाचे फेरबदल (EP) वगळून मंजूर केलेले आहे. तसेच शासन नगरविकास विभागाची अधिसूचना क्रमांक टिपीएस-१२१६/१६९७ /प्र.क्र. २०४/१६/नवि-१२, दिनांक ०९ मे २०१७ अन्वये सारभूत स्वरूपाचे फेरबदल (EP) वगळलेल्या भागास मंजुरी प्रदान केलेली आहे. (यापुढे जिचा एकत्रित उल्लेख "उक्त मंजूर विकास योजना" असा करण्यात आला आहे.)

आणि ज्याअर्थी, मौजे - गोळवली येथील स.नं. ८०, ८१ / १ / १/१ व २, ८२ (पै.), ८७/२, ८८/२, १७९, १२१/१ व २ एकूण क्षेत्र ४६०२.३७ चौ. मी. (यापुढे जिचा उल्लेख " उक्त भूखंड" असा करण्यात आला आहे.) हा भूखंड पूर्व मंजूर विकास योजनेतील २७ गावांच्या सेक्टर क्र. ०४ मधील आ.क्र. १३४ 'प्रभागक्षेत्र कार्यालय' याकरीता आरक्षित असून उक्त मंजूर विकास योजनेनुसार उक्त भूखंड आ.क्र. PG-१३ - २३०.०० चौ.मी., २४.०० मी. रूंद विकास योजना रस्ता ११००.०० चौ.मी.,रहिवास विभाग १२७०.०० चौ.मी. असा बाधीत आहे व उर्वरित क्षेत्रामध्ये महापालिकेचे जलकुंभ- २६००.०० चौ.मी. जागेवर आहे. उक्त महानगरपालिकेचे उप आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांनी इतर अधिकारी यांचे समवेत स्थळ पाहणी दरम्यान घनकचरा व्यवस्थापनाकरिता कार्यरत होणाऱ्या चारचाकी वाहने, गाडया इ. यांच्या वाहनतळाकरिता महानगरपालिकेच्या ताब्यात असलेले उक्त भूखंडाचे क्षेत्रावर नियोजन करण्याचे प्रस्तावीत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेतील आरक्षण व रस्त्यामुळे उक्त महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागास वाहनतळ उभारावयाच्या नियोजनास अडथळा होत आहे. उक्त भूखंडावरील ('A' शीट नुसार ) A ते B पर्यंत २४.०० मी. रूंद विकास

योजना रस्ता १२००.०० चौ.मी. आ. क्र. PG-१३ २३०.०० चौ. मी. वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्याचे आहे. तसेच 'A' शीट मध्ये दर्शविलेल्या B ते C पर्यंत २४.०० मी. रूंद विकास योजना रस्ता वगळून आ.क्र. PG-१३ या आरक्षणामध्ये १९५०.०० चौ.मी. क्षेत्र समाविष्ट करणे आवश्यक आहे. तसेच C ते D पर्यंत २४.०० मी. रूंद रस्ता वगळून सदरचे २७५०.०० चौ.मी. क्षेत्र आ.क्र. PO-२ मध्ये समाविष्ट करण्याचे आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त फेरबदल" असा करण्यात आला आहे.)

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेतील फेरबदल करण्यासाठी उक्त अधिनियमातील कलम ३७ (१) अन्वये उक्त महानगरपालिकेचा मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी प्रशासकीय ठराव क्र. २४०, दिनांक २४ ऑगस्ट २०२५ नुसार मान्यता दिली आहे.

आणि त्याअर्थी, उक्त फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा व 'A' शीट खालील ठिकाणी कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे.

१) सहाय्यक संचालक, नगररचना, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण (प.)

२) '९/आय' प्रभागक्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, खडेगोळवली, कल्याण (पू.)

उक्त फेरबदल प्रस्तावास ज्या नागरीकांना हरकत व / आणि सूचना असतील त्यांनी विहित स्वरूपात त्यांचे म्हणणे ही सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तीस (३०) दिवासांच्या आत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या सचिव कार्यालयामध्ये सादर करण्यात याव्या, जेणेकरुन सदर फेरबदलाचा प्रस्ताव शासन मंजुरीस सादर करण्यापूर्वी त्यावर विचार करता येईल.

**सं. ना. डोईफोडे,**
सहाय्यक संचालक, नगररचना,
कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

दिनांक १६ ऑक्टोबर २०२५.

## KALYAN-DOMBIVALI MUNICIPAL CORPORATION, KALYAN

As per section 37(*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966

**Notice**

Whereas, the development plan for 27 villages of Kalyan and Ambernath Talukas (herein after refer to as " the said development plan) situated in Kalyan Dombivali Municipal Corporation (hereinafter referred to as "the said Corporation") has been sanctioned by the Urban Development Department, Government of Maharashtra under section 31(*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, (hereinafter refer to as " the said Act") *vide* Notification No.TPS-1212/1697/ C.R.101/13/UD-12, dated 11th March, 2015 excluding the excluded parts (EP) and sanctioned the Excluded Part of the said Development Plan *vide* Urban Development Department Notification No.TPS-1216/1697/C.R.240/16/UD-12, dated 9th May, 2017 (hereinafter jointly referred to as "the said sanctioned Development Plan").

And Whereas, the plot situated at Mauje Golivali bearing Survey No. 80, 81/1/1/1 and 2, 82(P), 87/2, 88/2, 179, 121/1 and 2 having area admeasuring 4602.37 sq.mt. (herein after refer to as" the said plot) is in possession of the said Corporation as per previous Development Plan in Sector 4 of 27 villages having Reservation No. 134' Ward Office'. The said plot as per the said sanctioned Development Plan is affected by Reservation No. P.G.13 having area 230.00 sq.mt., 24.00 mt. wide DP Road having area 1100.00 sq.mt., Residential Zone having area 1270.00 sq.mt. and existing Overhead Water Tank having area 2600.00 sq.mt. The Deputy Commissioner, Solid Waste Management Department, of the said Corporation along with other officers during their site visit has finalized the said plot for developing a parking area for vehicles to be used by the said Corporation for Solid Waste Management.

And Whereas, it is difficult to plan for development of parking area for Solid Waste Management vehicles. It is necessary to make modification in the said development plan for said plot. The reservations on said plot are (details shown in 'A' Sheet) 24.00mt wide DP road from Point A to B area admeasuring 1200.00sq.mt., Reservation No. P.G-13 230.00 sq.mt., to be deleted and included in Residential Zone. Also 24.00mt wide road from B to C having area 1950.00 sq.mt. to be deleted and included in Reservation No. P.G.13 and 24.00mt wide road from Point C to D having area admeasuring 2750.00sq.mt. to be deleted and included in Reservation No. P.O.-2 (hereinafter referred to as " the said modification").

And Whereas, the Commissioner cum Administrator of said Corporation *vide* General Resolution No. 240, dated 24th August 2025 has consented to carry out the said modifications in the said sanctioned Development Plan as per section 37(*1*) of the said Act.

Now therefore, the plan depicting said modifications with Part plan and 'A' Sheet has been kept for inspection during office time and official days at following locations.

1. Assistant Director of Town Planning, Kalyan Dombivali Municipal Corporation, Kalyan (W)
2. 9-'I' Ward Office, Kalyan Dombivali Municipal Corporation, Khadegolivali, Kalyan (E).

I hereby invite all citizens to raise Suggestions And/Or Objections if any for the said modifications and the same shall be communicated to the office of the Secretary, Kalyan Dombivali Municipal Corporation within 30 days from the date of publication of this notice in *Gazette* of Government of Maharashtra, so that the received suggestion And/Or Objection can be taken into consideration before submitting the said modification to State Government for final approval.

S. N. DOIFODE,
Assistant Director of Town Planing, Kalyan
Dombivali Municipal Corporation, Kalyan.

Date 16th October 2025.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.